# अभा जोशी मेक्सिकोला रवाना

पनवेल (प्रतिनिधी) रोटरी क्लब ऑफ इंडस्ट्रीयल टाऊन या संस्थेच्यावतीने रोटरी युथ एक्सचेंज या योजनेतंर्गत पनवेलमधील अभा शिरिष जोशी या युवतीची निवड करण्यात आली आहे. तीला या योजनेतंर्गत मेक्सिको येथे पाठविण्यात आले आहे. या निवडीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, शहर कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष व रोटरीयन अरविंद सावळेकर, ज्येष्ठ नेते बबन जगनाडे, रोटरी क्लब ऑफ इंडस्ट्रीयल टाऊनचे अध्यक्ष डॉ. संपत ससाणे यांच्यासह पनवेलमधील अनेक मान्यवरांनी अभा जोशी यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

अभा जोशी मेक्सिको येथे एक वर्षाकरिता जाणार असून रोटरी युथ एक्सचेंज या योजनेतंर्गत मेक्सिकोतील एक विद्यार्थी पनवेलमध्ये येणार आहे. मेक्सिकोमध्ये जावून अभा जोशी हिला शैक्षणिक ज्ञानाबरोबरच तेथील संस्कृती, वातावरण, तेथील लोकांचे राहणीमान, अर्थकरण, तेथील युवकांमधील असलेले सामाजिक गुणदोष आणि सामाजिक स्थिती तसेच समाजात काम करणाऱ्या विविध संस्थांचा अनुभव घेवून अभ्यास करता येणार आहे. या रोटरी युथ एक्सचेंज योजनेतंर्गत जगातील विविध देशांतून दुसऱ्या देशात विद्यार्थ्यांना पाठविले जाते. यासाठी १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचा रोटरीच्यावतीने समावेश केला जातो.